# प्रेसनोट

दिनांक १४/०३/२०२४

**पनवेल तहसिल कार्यालय, ता. पनवेल, जि. रायगड येथील महसुल सहाय्यक अधिकारी यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचप्रत प्रतिबधंक विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| ठाणे दैनंदिनी नोंद कमांक | :- | पनवेल शहर पो.स्टे. ठाणे दैनंदिनी नोंद कमांक ६८/२०२४- १९:४२ वा. दि. १४/०३/२०२४ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :- | किरण अर्जुन गोरे, वय- ४८ वर्षे, महसूल सहाय्यक, तहसिल कार्यालय, पनवेल, जि. रायगड (वर्ग ३) |
| लाचेची मागणी रक्कम | :- | रू.८०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | :- | रू.४०,०००/- |
| थोडक्यात हकिकत | :- | तकारदार यांनी त्यांच्या वडीलोपार्जित शेती असलेली जमीन मुंबई कुळव्यवस्थापन व शेतजमिनी कायदे अंतर्गत जमीनीची नोंद कमी करून (भोगवटादार वर्ग-२) वरुन सदर जमीनीची भोगवटादार वर्ग - १ अशी दोन स्वतंत्र सर्व्हे कमांकाच्या जमिनीची नोंद करण्यासाठी लोकसेवक किरण गोरे हे रु. १,००,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक ०४/०३/२०२४ रोजी अे.सी.बी.नवी मुंबई कार्यालयात तक्रार दिली होती.<br><br>दिनांक ०४/०३/२०२४ रोजी शासकिय पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी दरम्यान लोकसेवक गोरे यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोंडीअंती रू. ८०,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br><br>त्यानंतर दिनांक १४/०३/२०२४ रोजी लोकसेवक गोरे यांनी तक्रारदार यांचेकडे एका जमीनीच्या नोंदी करीता रू. ४०,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करुन ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई यांनी आजमविलेल्या सापळा कारवाईचे दरम्यान लोकसेवक किरण अर्जुन गोरे यांनी तक्रारदार यांच्याकडून रू. ४०,०००/- लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना १७:४४ वाजता रंगेहाथ पकडले आहे. वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

**मार्गदर्शन अधिकारी :-मा.श्री. सुनिल लोखंडे पोलीस अधीक्षक, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

**संपर्कपत्ता :- ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्तीकारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१**

संकेतस्थळ :- acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई-मेल :- spacbthane@mahapolice.gov.in

ऑनलाईनतक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net

टोलफ्रीनं. :- १०६४

दुरध्वनी क्र. :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९/२७८३३३४४

व्हॉटस्ॲप क्र. :- ९९३०९९७७००

(संतोष पाटील)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई